**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २६ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत.**
2. **सद्सद विवेक बुद्धी हेच न्यायदानाचे मुख्य सूत्र- सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या प्रतिपादन.**
3. **राज्यात यापुढे पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प तीन वर्षात पूर्ण करावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
4. **२७ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांमुळे मनपाच्या आरोग्यसेवेत भर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

पावसाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै या कालावधीत मुंबईत पार पडणार असल्याची घोषणा विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली. विधानभवन येथे आयोजित विधानमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सरन्यायाधीश सत्कार

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ येथे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. खासदार बळवंत वानखडे, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय आचलिया, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यावेळी उपस्थित होते. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले, मी 'डॉ.पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ'चा विद्यार्थी आहे. न्यायिक शिक्षणाबाबत मला महाविद्यालयाकडून बाळकडू मिळाले. मी या महाविद्यालयाच्या ऋणी आहे. येत्या काळातही माझ्या हातून संविधानाच्या चौकटीत राहून न्यायदानाचे कार्य सुरू राहील व यातून देशाची सेवा करीत राहील. न्यायदानाचे कार्य करणाऱ्या प्रत्येकाने सदसद विवेक बुद्धीने न्यायदानाचे कार्य करावे. येथील विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात वंचितांना न्याय मिळवून देण्याची आपल्या पदाचा उपयोग करावा संविधान हे सर्वोच्च असल्याचे ते यावेळी म्हणाले

***22 वर्षांच्या कालखंडामध्ये न्यायमूर्ती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी हे संविधान दिल आणि त्या संविधानाचे जे मूल्य आहेत त्या मूल्यानुसार मी कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. नेहमी वाद होत असतो विच इज सुप्रीम जे वरिष्ठ मित्र उपस्थित आहेत जे पार्लमेंट लेजिस्लेचरला रिप्रेझेंट करतात आणि मध्यंतरी एका घटनात्मक व्यक्तीने म्हटल की पार्लमेंट इज सुप्रीम मी म्हटलं की Neither the Parliament nor the executive, nor the judiciary supreme. It is only the Constitution of India which is supreme.***

हा सत्कार सोहळा माझ्या महाविद्यालयात होत असल्यामुळे मला हा कौटुंबिक सोहळा वाटत असल्याचे ते यावेळी म्हणाले. उच्च न्यायालयाचे न्या. आचलिया, तसेच संस्थेचे अध्यक्ष देशमुख यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या वतीने सरन्यायाधीश न्या.गवई यांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्राचार्य वर्षा देशमुख यांनी तर आभार प्राची कडू यांनी मानले.

ॲड.आकाश फुंडकर

राज्यातील बांधकाम कामगारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून त्यांच्याकडून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध भागातून लोकप्रतिनिधी आणि  बांधकाम कामगारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नोंदणी, कीट वाटप तसच  अन्य बाबतीत गैरप्रकार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून आता राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून प्रभावी तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा कार्यालय प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र जिल्हास्तरीय दक्षता पथक गठीत करण्यात येणार आहे. या पथकांचे कार्यक्षेत्र मात्र त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याऐवजी दुसऱ्या जिल्ह्यावर असेल, जेणेकरून कारवाई अधिक निष्पक्ष आणि प्रभावी राहील. दक्षता पथकांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे होणारी नोंदणी, नोंदणीसाठी पैसे मागण्याचे प्रकार तसेच खोटे दाखले सादर करून मिळविले जाणारे लाभ या बाबींवर लक्ष केंद्रित करून तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे.

अमली पदार्थ विरोधी दिन

आज संपूर्ण विश्वात जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात येत आहे.नागपुरातही शहर पोलिसांचा वतीने शहर पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांच्या संकल्पनेतील "ऑपरेशन थंडर -2025"अंतर्गत आयोजित संपूर्ण नागपुरात 20 जून ते 26 जून 2025 पर्यंत अमली पदार्थ विरोधी सप्ताह साजरा करण्यात आला होता. या अमली पदार्थ विरोधी सप्ताहाचा आज कविवर्य सुरेश भट सभागृहात समारोप करण्यात आला. यावेळी निवृत्त महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय, शहर पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांच्यासह शहर पोलीस दलातील सर्व वरिष्ठ अधिकारी, पोलिस कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.. यावेळी शहर पोलिस दलातर्फे पोलिस, नागरिकांना अमली पदार्थ विरोधी शपथ देण्यात आली.

राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास विधान भवन येथे विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

मुख्यमंत्री

राज्यात यापुढे कुठलाही पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प रखडणार याची दक्षता घेत पुढील तीन वर्षात प्रकल्प पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे. दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुहेरी बोगदा हा ११.८४ किलोमीटर लांबीचा असणार आहे. त्यामुळे बोगद्यात हवा खेळती राहिली पाहिजे.

आरोग्य मंदिरांची भर

चांगले आरोग्य, चांगले मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्य वाढवते. अशात नागपूर महानगरपालिका ही संपूर्ण नागपूर शहरात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहे. नागपूर मनपा अंतर्गत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आता २७ आयुष्मान आरोग्य मंदिरांची भर पडली आहे. या केंद्रांचे लोकार्पण  मुख्यमंत्री  देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री  चंद्रशेखर बावनकुळे  राज्यमंत्री  शिष जयस्वाल यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत सर्वसामान्य जनतेला उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यास तत्पर आहे. यात केंद्र शासनाकडून १५ वित्त आयोग निधी अंतर्गत नागपूर शहराकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकूण ११३ आयुष्मान आरोग्य मंदिर अर्थात आरोग्यवर्धिनी केंद्राची मान्यता प्राप्त आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये ३ लाख ६९ हजार ५६६ रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला आहे. नागरिकांना मोठ्या संख्येत या आरोग्य सुविधांचे लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

धरती आबा

गोंदिया  जिल्ह्यात 49 गावात धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यात येणार आहे. काल ग्रामपंचायत मिसपिरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी यांचे मार्फत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आरोग्य मेळाव्यात आरोग्य तपासणी आणि  जनजागृती शिबीर संपन्न झाल्याची माहीती वैद्यकीय अधिकारी डॉ.रामटेके यांनी दिली आहे. आरोग्य विभागाच्या जनजागृती स्टॉल मध्ये क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, हिवताप, स्टॉप डायरीया, मलेरिया आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रमाच्या बॅनर आणि पोष्टरच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आल्याची माहीती प्राथमिक डॉ.रामटेके यांनी याप्रसंगी दिली आहे.

भूजल पुनर्भरण

वाशिम  जिल्ह्याने भूजल पुनर्भरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी करत जागतिक स्तरावर आपली छाप पाडली आहे. अवघ्या ४० दिवसांत ४० हजार जलतारा  निर्मितीचा विक्रम प्रस्थापित करत जिल्ह्याने वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स लंडनमध्ये आपले नाव नोंदवले आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल इंदोर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात वाशिम जिल्ह्याचा गौरव

करण्यात आला. राजस्थानचे माजी राज्यपाल कलराज मिश्र यांच्या हस्ते जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.यांना सन्मानित करण्यात आले.

हवामान

वाशिम जिल्ह्यामध्ये काल संध्याकाळी सहा वाजता पासून संततधार पाऊस सुरू आहे. या पावसाने जिल्ह्यातील नदी नाल्याला मोठ्या प्रमाणात पाणी आले असून नदी तसेच ओढ्याकाठच्या शेतीमध्ये पाणी शिरले आहे शेकडो हेक्टरवरील बियाणे वाहून गेले आहे. तर जिल्ह्यातून जाणारा नागपूर औरंगाबाद महामार्गावरील पिंपरी सरहद येथे पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.

*****